दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्टा सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २४३ । बुधवार २४ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

### सातशे विद्यार्थी व ५० कर्मचाऱ्यांचे भवितव्य टांगणीला

# काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या स्थलांतराचा घाट!

## स्थलांतरास विद्यार्थी–पालकांचा तीव्र विरोध । उद्या होणार व्यवस्थापन–पालकांची बैठक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** बोल्हेगाव फाटा येथील काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजचे स्थलांतर करण्याचा घाट व्यवस्थापनाने घातल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये खळबळ उडाली असून, अचानक घेतलेल्या या निर्णयाने तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, उद्या (गुरुवार) यासंदर्भात व्यवस्थापनाने विद्यार्थी व पालकांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, फार्मसी व नर्सिंग असे एकत्रित तीन शाखांचे शिक्षण येथे दिले जाते. या ठिकाणी नगर जिल्ह्यासह परजिल्ह्यातीलही विद्यार्थी मोठ्या संख्येने शिक्षण घेतात. नगर जिल्ह्यातील जुने व नामवंत कॉलेज म्हणून हे कॉलेज ओळखले जाते. सध्या होमिओपॅथिक मेडिकल शाखेत चार वर्षांचे मिळून एकूण सुमारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेतात. फार्मसीला सुमारे १५० तर नर्सिंगला १०० असे सुमारे साडेसातशे ते आठशे विद्यार्थी या ठिकाणी शिक्षण घेत आहेत. यासाठी सुमारे ५० कर्मचारी वर्ग येथे कार्यरत आहे.

दरम्यान, पूर्वी हे कॉलेज बोल्हेगाव फाटा येथे होते. परंतु जागेच्या न्यायप्रविष्ट प्रकरणात न्यायालयाच्या निर्णयानंतर मागील वर्षी हे कॉलेज चास (ता. नगर) येथे हलविण्यात आले. तेथे एक वर्षाच्या भाडेतत्त्वावर जागा घेऊन कॉलेज चालविण्यात येत होते. या जागेचा करार येत्या ३० जून रोजी संपत असल्याची माहिती समजली.

गेल्या वर्षी कॉलेज चासला हलविल्यानंतर तेथे नेहमीप्रमाणे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. तसेच साडेचार वर्षांच्या होमिओपॅथिक व इतर वर्गांत शिक्षण घेणारे विद्यार्थी येथे परंतु गेल्या काही दिवसांपासून कॉलेजचे स्थलांतर करून हे कॉलेज इतरत्र हलविण्यात येणार असल्याचे बोलले जात होते. त्यातही वाळकी (ता. नगर) येथे कॉलेज जाणार असल्याचे सांगण्यात येत होते. चास व वाळकी हे जवळजवळ असल्याने त्यासाठी विद्यार्थी व पालक वर्ग यांचीही मानसिक तयारी झाली होती.

परंतु काल (मंगळवारी) रात्री अचानक कॉलेजच्या ग्रूपवर व्यवस्थापनाने आपले कॉलेज भिगवण (ता. इंदापूर जि. पुणे) परिसरातील चिंचोली येथे शिफ्ट होणार आहे, असा मेसेज टाकला. तसेच संबंधित कॉलेजचे व हॉस्टेलचे लोकेशनही टाकले. अचानक घेतलेल्या या निर्णयाने विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली. विद्यार्थ्यांनी कॉलेजच्या ■ पान ४ वर

### गैरसोय व आर्थिक फटक्याची धास्ती

व्यवस्थापनाने हे कॉलेज भिगवण येथे नेल्यास ज्या संस्थेने हे कॉलेज चालवायला घेतले आहे, त्यांनी केलेल्या मागणीनुसार विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागणार आहे. सध्या भरलेल्या शुल्कापेक्षा त्यात मनमानी वाढ झाल्यास मोठा आर्थिक फटका बसणार आहे. शिवाय नगरपासून भिगवण दूर असून, त्याचाही खर्च वाढणार आहे. या आर्थिक नुकसानीची व होणाऱ्या गैरसोयीची धास्ती विद्यार्थी व पालकांनी घेतली आहे.

### विद्यार्थ्यांचे गाऱ्हाणे आमदार जगतापांकडे

कॉलेजने काल रात्री अचानक घेतलेल्या स्थलांतराच्या निर्णयाने विद्यार्थी हतबल झाले असून, यासंदर्भात आमदार संग्राम जगताप यांच्याशी संपर्क साधला. परंतु जगताप हे मुंबईत असल्याने राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष वैभव ढाकणे हे कॉलेजमध्ये आले. त्यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून यावर मार्ग काढण्याचे आश्वासन जगताप यांच्या वतीने दिले. नगर शहरातून कॉलेज कुठेही जाणार नाही याची जबाबदारी जगताप यांनी घेतलेली आहे. जर व्यवस्थापन कॉलेज विकण्यासाठी किंवा चालवायला देण्यासाठी तयार असेल तर तीही जबाबदारी घेण्याचा शब्द जगताप यांनी दिला असल्याचे ढाकणे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

### एकत्रित तीन शाखांचा अडसर!

जुने व नावाजलेले असलेल्या या कॉलेजचे व्यवस्थापन सध्या म्हस्के यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीकडून चालविले जात आहे. ते नगरमध्ये राहत नाहीत. नगरमधील अनेक शिक्षण संस्था कॉलेज चालविण्यास इच्छुक आहेत. परंतु होमिओपॅथिक, फार्मसी व नर्सिंग अशा तीन शाखा एकत्रितपणे चालविण्यात नगरमधील संस्थांना तांत्रिक अडचणी येत आहेत. कारण अनेक संस्थांकडे फार्मसी व नर्सिंग शाखा यापूर्वीच आहेत. त्यातून तिन्ही शाखा एकत्रित चालविणाऱ्या संस्थेचा शोध व्यवस्थापनातर्फे सुरू होता. भिगवणजवळील चिंचोली येथील एका इन्स्टिट्यूटने ही तयारी दाखविल्याने कॉलेजने स्थलांतराचा निर्णय घेतला, असे विद्यार्थ्यांकडून समजले.

## कन्हेर ओहोळ येथे भीषण अपघात; पती–पत्नीचा जागीच मृत्यू

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर तालुक्यातील कन्हेर ओहोळ परिसरात २३ जून २०२६ रोजी सकाळी सुमारे ११.५० वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील पती–पत्नीचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली.

पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या फिर्यादीनुसार, मूळ उमगाव (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) येथील भिमराव गुंडू कांबळे व त्यांची पत्नी गौरी भिमराव कांबळे हे जागेच्या खरेदीच्या कामानिमित्त पारनेरकडे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी पारनेर रोडवरील कन्हेर ओहोळ परिसरात मागून येणाऱ्या कॉंक्रीट मिक्सर (एमएच–१६ सीडी–९१५०) वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

अपघातानंतर दोघेही रस्त्याच्या बाजूला पडले असून मिक्सरच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांच्या डोक्याला, छातीला तसेच हात–पायांना गंभीर दुखापती झाल्या. या भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी मृत भिमराव कांबळे यांचे भाऊ संदीप गुंडू कांबळे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून आणल्याचा आरोप मिक्सर चालकावर करण्यात आला आहे. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून पारनेर पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## रुद्राक्ष कामठे तबला परीक्षेत प्रथम श्रेणी व विशेष योग्यतेसह उत्तीर्ण

### आरोही संगीत विद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई यांच्या वतीने एप्रिल–मे २०२६ या सत्रात घेण्यात आलेल्या संगीत प्रवेशिका पूर्ण (तबला) परीक्षेत आरोही संगीत विद्यालयाचा विद्यार्थी चि. रुद्राक्ष तुकाराम कामठे याने प्रथम श्रेणी व विशेष योग्यते सह उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे . तसेच तबला व गायन या परीक्षांमध्ये



भाग घेतलेले सर्व विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होऊन आरोही संगीत विद्यालयाची शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाचे संचालक प्रा. स्वप्निल खराडे सर, महेश खोपटीकर सर व सौ शितल खराडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून विद्यालयाचे मार्गदर्शक ह. भ. प. रावसाहेब महाराज खराडे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## अवैध दारू व जुगार अड्ड्यांवर छाप्यात दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर शहर, श्रीरामपूर तालुका आणि अकोले पोलीस ठाण्याच्या हद्दीत वेगवेगळ्या ठिकाणी टाकलेल्या छाप्यांमध्ये एक अवैध दारू विक्रेता आणि ३ जुगार अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली असून, एकूण १ लाख ५६ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एलसीबीच्या पथकाने २३ जून रोजी गुप्त माहितीच्या आधारे श्रीरामपूर व अकोले भागात छापे टाकले. या मोहिमेत एकूण ४



गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष मुटकुळे, पोलीस अंमलदार

## दिल्लीगेट येथील रस्ता दुभाजक असून अडचण


### महिनाभरात तिसरा अपघात

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील दिल्लीगेट वेस ते घोरपडे हॉस्पिटल पर्यंत राहिलेला रस्ता दुभाजक हा वाहन चालकांना अत्यंत धोकादायक बनला आहे. गेल्या महिनाभरात तिसरा अपघात या दुभाजकामुळे घडलेला आहे. मंगळवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास पुन्हा एक स्विफ्ट डिझायर कार या दुभाजकाला धडकून अपघात झाला या घटनेमध्ये कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

दहा ते बारा दिवसापूर्वीच याच ठिकाणी दोन वाहनांचा भीषण अपघात झाला होता. दिल्लीगेट ते नेप्ती नाका रस्त्यावर काही महिन्यांपूर्वीच ठेकेदाराच्या माध्यमातून रस्ता दुभाजक उभारण्यात आले होते. या रस्ता दुभाजकामुळे भीषण अपघात होत आहेत. या अपघातामध्ये एका ट्रक सह कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.

हा अपघात सुद्धा संध्याकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडला. हे अपघात येत्या महिनाभरातील आहेत यापूर्वी अनेक वाहनांचे याच रस्ता दुभाजकाला धडकून अपघात झालेले आहेत.संध्याकाळच्या सुमारास रस्ता दुभाजक दिसून न आल्याने



एक ट्रक थेट दुभाजकावर चढला. या अपघातामध्ये ट्रकचे पुढील दोन्ही चाके निखळून पडली तर दुभाजकाचा चा तुटलेला भाग रस्त्यावर आल्याने नेप्ती नाक्याकडे जाणारी एक स्विफ्ट डिझायर कार रस्ता दुभाजकाच्या तुटलेल्या भागावर धडकून त्याच ठिकाणी पुन्हा दुसरा अपघात झाला. या अपघातामध्ये कोणीही जखमी झाले नसले तरी दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले होते. अशाच प्रकारे अनेक वाहनांचे याच ठिकाणी अपघात झालेले आहेत या अपघातामध्ये जखमी कोणीही झाले नसले तरी वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. ■ पान ४ वर

### रात्रीच्या वेळी समोरून येणाऱ्या वाहनांना दुभाजक दिसून येत नाही

रस्ता दुभाजक उभे केल्यापासून आजपर्यंत कमीत कमी दहा ते पंधरा वाहनांना याच ठिकाणी अपघाताला सामोरे जावे लागले आहे. येत्या महिनाभरातच तीन ते चार अपघात झाले आहेत. आता उर्वरित दुभाजक सुद्धा महानगरपालिकेने त्वरित काढून टाकावा अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.

## पारनेरचा चेहरामोहरा बदलणार – आ. काशिनाथ दाते

### विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी गेल्या दीड वर्षांत सुमारे २० ते २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून विविध विकासकामे मार्गी लावली असून, आगामी काळातही पारनेरचा चेहरामोहरा बदलण्यासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी दिली. पारनेर नगरपंचायत हद्दीतील १ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या स्ट्रिटलाईट प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते.

यावेळी आमदार दाते यांनी पारनेर शहराच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेताना सांगितले की, आमदार झाल्यानंतर दिवंगत नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांनी पारनेर शहराच्या विकासासाठी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. नगरसेवक अशोक चेडे, पैलवान युवराज पठारे, राजू औटी यांच्यासह अनेकांच्या मागणीनुसार हा निधी शहरातील विविध विकासकामांवर खर्च करण्यात आला. त्यानंतर तत्कालीन नगरविकास मंत्री



ना. एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त जाहीर करण्यात आलेल्या 'नमो उद्यान' योजनेसाठी १ कोटी रुपयांचा निधी पारनेरसाठी मंजूर केला आहे.

पारनेर हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असले तरी शहराच्या मूलभूत सुविधांची अवस्था एका खेडेगावापेक्षाही वेगळी नव्हती. त्यामुळे पारनेर शहर आधुनिक आणि आकर्षक स्वरूपात विकसित करण्याचा निर्धार आपण केला असल्याचे सांगताना आमदार दाते म्हणाले शहराकडे येणाऱ्या सहा प्रमुख मार्गांवर १ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीतून स्ट्रिटलाईट बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सुपा व अळकुटीकडे जाणाऱ्या रस्त्यांची कामे सुरू असून संबंधित एजन्सीकडे या मार्गांवरही स्ट्रिटलाईटची सुविधा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच शहरातील सर्वच प्रमुख रस्ते प्रकाशमान होणार आहेत. पारनेर शहरातील स्मशानभूमीमध्ये महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था आणि शेड उभारण्यासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून उर्वरित कामांसाठी ३० लाख रुपयांची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शहरातील पेठेचा मुख्य रस्ता अत्यंत खराब झाल्याने त्याच्या तात्पुरत्या दुरुस्तीसाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. भविष्यात . ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शुक्रवारी बालरोग मोफत तपासणी शिबिर

अहिल्यानगर- जैन सोशल फेडरेशन संचालित



आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शुक्रवार दि.२६ जून २०२६ रोजी सकाळी १० ते २ यावेळेत बालरोग मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालरोगावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये नवजात शिशुंसाठी २६ बेडचा अद्ययावत एन.आय.सी.यु. आहे. नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस.(श्वसन दाह), काविळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवांशिक व जन्मजात आजारांचे निदान, लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, २४ तास पॅथोलॉजी लॅब, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तपासणी मशीन, २४ तास तज्ज्ञ डॉक्टर, महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया सुविधा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रूपये ( संपर्क : मो. ९४०५२७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये ( संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. ( संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सॅम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सॅम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२.). मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१- २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

### उत्तर प्रदेशातील नैमिषारण्य येथे १५० भाविकांच्या उपस्थितीत कार्यक्रम



अहिल्यानगर : आपल्या पर्यटक ग्राहकांसाठी वेगवेगळे उपक्रम राबविणार्या येथील श्री रेणुका ट्रॅव्हल्सने अधिक मासानिमित्त आयोजित केलेला नैमिषारण्य येथील शिवमहापुराण कथा कार्यक्रम उत्साह व आनंदी वातावरणात संपन्न झाला. अधिक मासानिमित्त झालेल्या या कार्यक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले. एक चांगला उपक्रम 'रेणुका'ने घडवून आणल्याबद्दल समाधान व्यक्त केले. नगरमधील सुप्रतिष्ठित व पर्यटकांच्या जिव्हाळ्याच्या श्री रेणुका ट्रॅव्हल्स कंपनीने उत्तर प्रदेशातील सीतापूर जिल्ह्यातील पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या नैमिषारण्य येथे छत्रपती संभाजीनगर येथील हरिभक्त परायण जयंतमहाराज नांदेडकर यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवमहापुराण कथा पर्यटकांना ऐकण्याची संधी दिली. 'अधिकस्य अधिक फलं' उक्तीनुसार या अधिक मासाच्या यात्रेत भाविकांना अनुभव आला. नैमिषारण्य यात्रेमध्ये सुमारे १५० जण सहभागी होते. यात्रा ७ दिवसांची होती. येताना व जाताना रेल्वेने आरामदायी प्रवास तसेच स्थानिक १५ जणांच्या स्वयंपाकी ग्रुपसह ही सहल असल्याने पर्यटक खुश होते. सकाळी ९ ते १ पर्यंत कथा कालावधी होता. त्यानंतर शुद्ध शाकाहारी भोजन व्यवस्था सर्वांसाठी होती. सात दिवस चाललेल्या या कथा श्रवणाबरोबरच भाविकांनी परिसरातील ललितादेवी, सिद्धपीठ मंदिर, व्यास गादी, गोमती नदी स्नान, मनुसतरुपा समाधी, पांडव किल्ला, हनुमान गढी, श्री बालाजी मंदिर, कालीपीठ मंदिर, देवदेवेश्वर रुद्रावर्त, दधिची मंदिर, हत्याहरण तीर्थ तसेच अयोध्या येथील राम मंदिर आदि ठिकाणांच्या दर्शनाचा लाभ घेतला. कथेच्या सांगता दिनी सत्यनारायण महापूजाही करण्यात आली.जयंतमहाराज नांदेडकर यांची कथा सुरू होण्याआधी भाविक रोज येथील चक्रतीर्थावर स्नान करण्यासाठी जात. जेथे कथा सांगितली जात होती, त्या बलराम धर्मशाळेपासून हे ठिकाण सुमारे एक किलोमीटर होते. कथा स्वरूपानुसार बलराम धर्मशाळेमध्ये शंकर-पार्वती विवाह व तत्सम प्रसंगांचे जिवंत देखावे सादर करण्यात आले. यामुळे प्रत्यक्ष तो प्रसंग पाहत असल्याचे भाविकांना वाटत होते. कथेच्या सुरूवातीस सकाळी ८ वाजता शोभायात्रा व ग्रंथ दिंडी संपन्न झाली.

# अहिल्यानगर जिल्ह्यात २६ जूनपर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा येलो अलर्ट

**नागरिकांनी दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार अहिल्यानगर जिल्ह्यात २६ जून २०२६ पर्यंत तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, मध्यम पाऊस व सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असल्याने जिल्ह्यासाठी येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य नुकसान टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे.

मेघगर्जना होत असताना, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये. सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. तसेच टॉवर्स, ध्वजांचे खांब, विजेचे खांब, धातूचे कुंपण, रोहित्र व लोंबकळणाऱ्या केबल्सपासून दूर राहावे. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा व कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क ठेवावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल, सायकल तसेच जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी त्यांच्या आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वादळी वारा, पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी वेळीच नियोजन करून आपला शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या वा नियोजित केलेल्या मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. धरण व नदी क्षेत्रात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घेऊन धरणाच्या पाण्यात, नदीच्या वा कालव्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये व धोकादायक ठिकाणी स्वतःचे छायाचित्र काढू नये. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाद्वारे दिलेल्या सूचनांचे पालन करावे. मदतीसाठी नजीकचे पोलीस स्टेशन, तहसील कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय येथील ०२४१-२३२३८४४, २३५६९४० या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ११२, १०७७ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त एसा असोसिएशनच्या वतीने सभासदांसाठी योग कार्यशाळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) अहिल्यानगर आणि अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष योग कार्यशाळेत योगाविषयी माहितीपूर्ण व्याख्यान, योग प्रात्यक्षिके आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाचा लाभ घेतला.

यावेळी योग शिक्षक दिलीप कटारिया यांनी भारत सरकारच्या आयुष मंत्रालयांतर्गत योगासनांचे विविध प्रकार, त्यांचे आरोग्यदायी फायदे आणि दैनंदिन जीवनातील महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. योगासनांच्या माध्यमातून शरीर आणि मन यांचा समतोल राखला जातो, मानसिक तणाव कमी होतो आणि व्यक्ती निरोगी जीवन जगू शकते, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, नियमितपणे योगासने केल्यास विविध आजारांवर नियंत्रण मिळवता येते तसेच दीर्घायुष्य लाभते. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या आरोग्य समस्यांवर योग हे प्रभावी उत्तर असून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन दिनचर्येत योगाचा समावेश करणे गरजेचे आहे.

कार्यक्रमात योग शिक्षिका विनया संजय विधाटे यांनीही उपस्थितांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी योगविद्याधाम येथे योगा इन्स्ट्रक्टर कोर्स पूर्ण करून योगप्रवेश, योग परिचय आणि योग प्रबोध या पदव्या संपादन केल्या आहेत. महिलांच्या वाढत्या व्यस्त जीवनशैलीचा विचार करून त्यांनी महिलांसाठी ऑनलाइन योग वर्ग सुरू केले असून आहारशास्त्राचे महत्त्व लक्षात घेऊन आहारतज्ज्ञ म्हणूनही प्रशिक्षण घेतले आहे. याशिवाय गर्भवती महिलांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या गर्भसंस्कार प्रशिक्षकाची पदवीही त्यांनी प्राप्त केली आहे.

यावेळी त्यांनी उपस्थित सभासदांना सूर्यनमस्कार, ताडासन, कपालभाती, अनुलोम-विलोम, भ्रामरी प्राणायाम, वज्रासन आणि शवासन यांसारख्या विविध योगप्रकारांची माहिती देत त्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून घेतले. श्वसनाचे महत्त्व, योग्य आहार आणि आरोग्यपूर्ण जीवनशैली याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

विनया विधाटे म्हणाल्या की, सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे आणि फास्ट फूडच्या वाढत्या वापरामुळे अनेक आजार निर्माण होत आहेत. सकाळी उठल्यानंतर योग्य प्रमाणात पाणी पिणे, तसेच शरीराच्या प्रकृतीनुसार मध, जिरे, अजवाईन, ओवा यांसारख्या नैसर्गिक घटकांचे सेवन केल्यास अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. संतुलित आणि योग्य आहारामुळे निरोगी जीवन जगणे शक्य होते.

# थकीत भविष्य निर्वाह निधीसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सामूहिक आत्मदहनाचा ईशारा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा ग्रामपंचायत अस्तित्वात असताना व त्यानंतर नगरपंचायत स्थापन झाल्यापासून अनेक स्वच्छता कर्मचारी व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी नियमितपणे कपात करण्यात आला आहे.मात्र सदर रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या खात्यात आजपर्यंत जमा करण्यात आलेली नसल्याने सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सामूहिक आत्मदहन करण्याचा ईशारा मुख्याधिकारी नगरपंचायत यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

सदर निवेदनात म्हटले आहे की वरील प्रश्नांच्या संदर्भात अनेक वेळा अर्ज, निवेदने व पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, तर काही कर्मचाऱ्यांचे निधन झाले असून त्यांच्या वारसांनाही हक्काची रक्कम मिळालेली नाही. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेली रक्कम न जमा करणे ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधित कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी आहे.

या निवेदनाची प्राप्ती झाल्यापासून आठ दिवसांच्या आत सर्व कर्मचाऱ्यांचा थकीत ईपीएफ भविष्य निर्वाह निधी त्यांच्या खात्यावर जमा करून त्याबाबतचा अहवाल लेखी स्वरूपात सादर करण्यात यावा,अन्यथा प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात व आपल्या न्याय्य हक्कासाठी समस्त ईपीएफधारक कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांकडून सामूहिक आत्मदहन आंदोलन करण्यात येईल.

या आंदोलनातून उदभवणाऱ्या कोणत्याही जीवितहानीस अथवा कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नास नेवासा नगरपंचायत प्रशासन व संबंधित अधिकारी पूर्णपणे जबाबदार राहतील असे ही निवेदनात ईशाऱ्याद्वारे स्पष्ट केले आहे.निवेदनावर सतीश सरोदे, कल्पना रामचंद्र चक्रनारायण, उल्हासाबाई बहिरु चक्रनारायण, लीना यशुदास साळवे, शशिकला मनोहर चक्रनारायण,वैजता भोसले,सुनीता ताराचंद चव्हाण यांच्या सहया आहेत.

## हातोळण गावची पहिली वकील कीर्ती मिसाळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** हातोळण, औरंगपूर (ता. आष्टी) येथील कायद्याची पदवी घेणारी पहिली तरुणी म्हणून कीर्ती बाळासाहेब मिसाळ हिने बहुमान मिळविला. एलएलबीचा नुकताच निकाल लागला असून, तिने घवघवीत यश मिळविले आहे. कीर्ती बाळासाहेब मिसाळ ही सीना नदी काठावरील हातोळण येथील रहिवासी आहे. तिचे प्राथमिक शिक्षण हातोळण, घोगरगाव (ता. श्रीगोंदा) व अहिल्यानगर येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर तिने खडतर परिश्रम घेत अहिल्यानगर लॉ कॉलेजमधून एलएलबीची पदवी घेतली.

हातोळण गावातील ती पहिली वकील ठरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब मिसाळ यांची कन्या आहे. सरपंच भारती मिसाळ यांची भगिनी आहे. तिच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आनंद योग केंद्राच्या प्रभात योग रॅलीने सावेडी परिसर दुमदुमला

**२५० साधकांचा उत्स्फूर्त सहभाग; 'करे योग, रहे निरोग'च्या घोषणांनी दिला आरोग्याचा संदेश**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगाचे महत्त्व जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी आनंद योग केंद्राच्या वतीने सावेडी परिसरात प्रभात योग रॅली काढण्यात आली. यामध्ये सुमारे २५० योगसाधक, विद्यार्थी आणि योगप्रेमींनी या रॅलीत उत्साहाने सहभाग नोंदविला. योगविषयक जनजागृती करणाऱ्या घोषणांमुळे संपूर्ण सावेडी परिसर योगमय वातावरणाने दुमदुमून गेला.

"करे योग, रहे निरोग", "चला उठा योग करा", "शिकू आणि शिकवू या, साऱ्या जगात योग नेऊ या" अशा प्रेरणादायी घोषणांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. गेल्या आठ वर्षांपासून आनंद योग केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग रॅलीचे आयोजन करण्यात येत असून, यंदाही या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची ' ' (आरोग्यदायी वृद्धत्वासाठी योग) ही संकल्पना रॅलीत विशेष आकर्षण ठरली. या विषयावरील फलक आणि संदेशफलक सहभागींच्या हातात झळकत होते. योगामुळे सर्व वयोगटांतील व्यक्तींना निरोगी आणि सक्रिय जीवन जगता येते, हा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

रॅलीदरम्यान भिस्तबाग चौकात योगसाधकांनी विविध योगासनांचे आकर्षक प्रात्यक्षिक सादर केले. वृक्षासन, ताडासन, त्रिकोणासन, सूर्यनमस्कार आदी योगप्रकारांचे सादरीकरण पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात योगसाधकांचे कौतुक करत त्यांना उत्स्फूर्त दाद दिली. यानंतर शुभमंगल कार्यालयात आयुष मंत्रालयाने निर्धारित केलेल्या योग प्रोटोकॉलनुसार सामूहिक योगसाधनेचे आयोजन करण्यात आले. जवळपास २०० साधकांनी एकत्रितपणे योगाभ्यास, प्राणायाम आणि ध्यानधारणा केली. विविध योगासनांच्या प्रात्यक्षिकांसह सहभागी साधकांनी उत्कृष्ट समन्वय आणि शिस्तीचे दर्शन घडविले.

आनंद योग केंद्राचे प्रमुख दिलीप कटारिया यांनी योगाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, "जीवन आनंदी, निरोगी आणि व्याधीमुक्त जगायचे असेल तर योग हा सर्वोत्तम पर्याय आहे. त्यामुळेच आज संपूर्ण जग योगाकडे आकर्षित झाले आहे. मात्र आळस आणि कंटाळा यामुळे अनेकजण योगापासून दूर राहतात. लोकांना केवळ योगाचे शिक्षण देणे नव्हे, तर त्यांना प्रत्यक्ष योगाभ्यास करण्यास प्रवृत्त करणे हा आनंद योग केंद्राचा मुख्य उद्देश आहे."

ते पुढे म्हणाले की, आनंद योग केंद्राच्या माध्यमातून अनेक नागरिकांनी आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार केला असून नवीन साधकही मोठ्या प्रमाणावर केंद्राशी जोडले जात आहेत. सावेडी परिसरातील नागरिकांनी या निशुल्क योग केंद्राचा लाभ घ्यावा. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि व्याधींनी त्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी 'चेअर योगा'चे नियमित प्रशिक्षण दिले जात असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

या उपक्रमासाठी रेणावीकर शाळा, केशवराव गाडेकर हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच मानसी कोकीळ, अंजली चौरे, जयश्री देशपांडे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमात प्रशांत बिहाणी, दिलीप पवार, राजेंद्र कलापुरे, उषा पवार, पूजा ठमके, सोनाली जाधववार, डॉ. मनीषा जायभाय, रेखा हाडोळे, संगीता जाधव, राजुल कटारिया, स्मिता उदास, वंदना मुसळे, वैशाली गोखले, श्लोका रीक्कल आदींसह अनेक योगप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निहाल कटारिया, शंकर मिसाळ, राजेंद्र कलापुरे आणि सुरेश म्हस्के यांनी विशेष परिश्रम घेतले. योगाबाबत जनजागृती निर्माण करत नागरिकांना निरोगी जीवनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले.

## वसुंधरा वनराई प्रकल्पास अधिकाऱ्यांची भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर** –देवी भोयरे ता.पारनेर येथील 'वसुंधरा वनराई प्रकल्प' येथे मागील आठवड्यात कर्मयोगी सदस्य वर्गाने भेट दिली होती.त या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाचे मा.उपायुक्त भालचंद्र मुळे आणि पांडुरंग बेलोटे यांच्या नेतृत्वाखाली नाला बडिंग काम झाले होते. त्याठिकाणी काल झालेल्या पाऊसाने पाणी आले.



या प्रकल्पाने श्रमदानातून पाणी अडवा,पाणी जिरवा या तत्वा प्रमाणे जे नाला बडिंगचे काम केले त्या कामाच्या यशाची पावती पाण्याच्या साठवणुकीतून झाल्याचे दिसून येते.यामुळे पाण्याच्या पातळीत (वॉटर टेबल ) निश्चितच वाढ होईल. त्याच प्रमाणे वृक्ष लागवड यशस्वी होण्यासाठी बडिंग चा प्रयोग यशस्वी होईल. याबाबत श्री. भालचंद्र मुळे आणि सर्व सदस्य, ग्रामस्थ, विद्यार्थी वर्गाचे अभिनंदन.

# आमदार दातेंच्या आक्रमक भूमिकेनंतर सरकारची भूमिका स्पष्ट; चारा विकासासाठी विशेष निधी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–**राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती व पशुधनासमोरील चारा टंचाईच्या प्रश्नावर पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी प्रश्नाला उत्तर देताना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन पशुधनासाठी चारा उपलब्धतेचे नियोजन शासनाने हाती घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मंत्री मुंडे यांनी सांगितले की, राज्यातील संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी वार्षिक योजनेअंतर्गत किमान १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधीची तरतूदही करण्यात येणार आहे.

आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नामध्ये राज्यातील चारा विकास कार्यक्रमासाठी उपलब्ध निधी, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या तरतुदी तसेच चारा बियाण्यांच्या वितरणाबाबत माहिती मागितली होती. त्यास उत्तर देताना मंत्री मुंडे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना ही पशुपालकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येत असून, त्यामध्ये चारा विकास कार्यक्रमाचाही समावेश करण्यात आला आहे. याशिवाय राज्यातील पशुपालकांना चारा पिकांच्या बियाण्यांचे वितरण, चारा पिकांचे प्रात्यक्षिके तसेच चारा नियोजनाचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पशुसंवर्धन विभाग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना आणि ग्रामीण भागातील विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत असल्याचेही मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आमदार काशिनाथ दाते यांनी दुष्काळी परिस्थितीचा विचार करून पशुपालकांना वेळेत मदत मिळावी, चारा टंचाई निर्माण होऊ नये आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुधनाचे संरक्षण व्हावे, यासाठी शासनाने ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी सभागृहात केली होती. या प्रश्नामुळे राज्यातील पशुपालकांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आल्या असून, चारा विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट झाल्याने पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

# स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



अहिल्यानगर - प्रवाशांच्या सोयीसाठी तसेच डिजिटल व्यवहारांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या स्मार्ट कार्ड () नोंदणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जनसेवक स्वप्निलदादा शिंदे यांच्या पुढाकारातून व स्वप्निलदादा शिंदे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये तीन दिवसांत मोठ्या संख्येने नागरिकांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली. दि. २२ ते २४ जून २०२६ या कालावधीत जनसंपर्क कार्यालय, पाटील हॉस्पिटल शेजारी, कोठी, अहिल्यानगर येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत सुरू असलेल्या शिबिरात नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत डिजिटल प्रवास व्यवस्थेचे स्वागत केले. महामंडळाच्या स्मार्ट कार्डमुळे नागरिकांना बस, मेट्रो तसेच इतर सार्वजनिक वाहतूक सेवांसाठी एकाच कार्डचा वापर करता येणार आहे. त्यामुळे तिकीटासाठी रांगेत उभे राहण्याची गरज कमी होणार असून रोख पैशांच्या व्यवहारांनाही पर्याय उपलब्ध होणार आहे. याशिवाय हे कार्ड आधार कार्ड, मोबाईल क्रमांक किंवा कार्डशी लिंक करता येत असल्याने सर्व व्यवहारांची सुरक्षित व पारदर्शक नोंद ठेवणे शक्य होणार आहे.शासनाच्या डिजिटल उपक्रमांना बळकटी देणाऱ्या या योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. शिबिरादरम्यान नोंदणीसाठी नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करून त्यांची नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यात आली. डिजिटल अहिल्यानगरच्या दिशेने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असून नागरिकांनी अशा उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जनसेवक स्वप्निलदादा शिंदे यांनी केले. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल नागरिकांनी स्वप्निलदादा शिंदे मित्र मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

# केडगावच्या अमित नगरमध्ये सिमेंट रस्ता व ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ

अहिल्यानगर - केडगाव येथील प्रभाग क्रमांक १७ मधील अमित नगर परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधेचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. रेल्वे ब्रिजकडून देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील अमित नगर भागात सिमेंट काँक्रीट रस्ता व ड्रेनेज लाईन कामाचा शुभारंभ परिसरातील नागरिकांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी नगरसेवक मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, मयूर बांगरे, निलेश बांगरे, विवेक रसाळ,संगीता साळुंखे, लक्ष्मीबाई जाधव, अर्चना जाधव, लिलाबाई रणे, वर्षा चोभे, लक्ष्मण कांबळे, योगीराज काकडे, विजय जाधव, बाळासाहेब रणे, सुनील जोशी, अपर्णा धर्माधिकारी, रमाकांत दानी, डॉ. सर्वेश रसाळ, विद्यानंद रसाळ आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, अमित नगर परिसरातील रस्त्याची नागरिकांची अनेक दिवसांपासून मागणी होती. या कामासाठी माजी खासदार सुजयदादा विखे पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिला. मात्र रस्त्यासोबतच ड्रेनेज लाईनची समस्या देखील सोडवणे गरजेचे होते. याबाबत आमदार संग्राम जगताप यांच्याकडे पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी ड्रेनेज लाईनसाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे आज रस्ता आणि ड्रेनेजचे काम एकाच वेळी सुरू होत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी प्रभागातील विकासकामे ही सातत्याने सुरू असून, उर्वरित अंतर्गत कामे देखील टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जातील. नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी चारही नगरसेवक एकत्रितपणे प्रयत्नशील असल्याचे देखील सांगितले.शजालिंदर कोतकर म्हणाले की, केडगाव प्रभाग क्रमांक १७ मध्ये विविध विकासकामांना गती मिळाली आहे. रस्ते, ड्रेनेज आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. नागरिकांच्या सहकार्याने प्रभागाचा सर्वांगीण विकास साधला जाणार असल्याचे ते म्हणाले.

# वाहतूक पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचा अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा-टॅक्सी चालक-मालक संघटनेकडून सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहर वाहतूक शाखेत नव्याने नियुक्त झालेल्या पोलीस निरीक्षक महेश पाटील यांचा अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, कार्याध्यक्ष विलास कराळे पाटील, सरचिटणीस अशोक औशीकर, संघटक नासिर खान, जिल्हा कार्यकारिणी सदस्य सोपान दळवी, सागर लांडे, सुनील खरपे, सुनील ढोले, राजू टिपरे, अंबादास येमुल, जुनेद बागवान, गोरख आंबेकर, गोरख खांदवे, सचिन व्हावळ, चैतन्य वैराळ, संतोष गव्हाणे, समीर गीते, निलेश कटके, गोरख सुरंगे, अन्वर शेख, फारुखभाई, प्रकाश गोसावी, भगवान सुतार, भोला शिंदे, सतीश भोबाळ, दिलीप गिरी, गणेश गांगर्डे, बाबासाहेब साळवे, फारुख शेख, मारूप शेख, आनंद दिवटे, घोरपडे मामा यांच्यासह शहरातील विविध रिक्षा स्टॉपचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर झालेल्या बैठकीत शहरातील वाहतूक व्यवस्थापन, वाहतुकीचे नियम, रिक्षा स्टॉपची शिस्तबद्ध व्यवस्था, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना, वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी समन्वय आणि रिक्षाचालकांनी नियमांचे काटेकोर पालन करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी रिक्षा व टॅक्सी चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करून नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार सेवा द्यावी, असे आवाहन केले. तसेच वाहतूक शाखा आणि रिक्षा-टॅक्सी संघटना यांच्या समन्वयातून शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. संघटनेचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी वाहतूक शाखेसोबत सकारात्मक सहकार्य करण्याची भूमिका मांडत, रिक्षाचालकांच्या विविध समस्या आणि रिक्षा स्टॉपशी संबंधित प्रश्न प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासावर भर द्यावा - राजेंद्र धाडगे

## श्री समर्थ विद्यामंदिरात दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून विद्यार्थ्यांचे शरीर, मन, मनगट आणि मस्तक तंदुरुस्त असणे तितकेच आवश्यक आहे. अभ्यासासोबतच खेळ, कला, विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचा समतोल साधणारा विद्यार्थीच भविष्यात यशस्वी ठरू शकतो, असे प्रतिपादन पुणे येथील सहाय्यक अभियंता राजेंद्र धाडगे यांनी केले.

श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागात इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करताना त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी होते. प्रमुख उपस्थितीत संस्थेचे सचिव सुरेश क्षीरसागर, संचालक दीपक ओहळ, संध्या कुलकर्णी, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अजय महाजन, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील कानडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



मार्गदर्शन करताना राजेंद्र धाडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाची गरज ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर केला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे अनेक क्षेत्रांमध्ये क्रांती घडत असली तरी मानवी मूल्ये, सर्जनशीलता, मेहनत आणि जिद्द यांना पर्याय नाही. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. पालकांनी आपल्या पाल्यांची आवड, क्षमता आणि कौशल्ये ओळखून त्यांना योग्य क्षेत्र निवडण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. केवळ गुणांच्या स्पर्धेत अडकून न पडता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, सातत्यपूर्ण परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे विद्यार्थ्यांना यश मिळते. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या यशावर समाधान न मानता भविष्यातील मोठी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत. शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नेहमीच कटिबद्ध राहील, असेही त्यांनी नमूद केले.

# पारगाव मौलाच्या चिमुकल्यांसाठी उघडले 'आशेचे द्वार'!

## पुण्याच्या प्रतिष्ठानकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप; विद्यार्थ्यांचे भविष्य होणार प्रकाशमान




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नावातच सकारात्मकता असलेल्या पुणे येथील 'आशेचे व्दार प्रतिष्ठान'ने नगर तालुक्यातील पारगाव मौला जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खरोखरच आशेचे नवे द्वार खुले केले आहे. संस्थेच्या वतीने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग, वॉटर बॉटल, नोटबुक्स, पेन, पेन्सिल आणि रबर किट अशा संपूर्ण शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.नव्या कोऱ्या साहित्यासोबतच चॉकलेट आणि बिस्किटे मिळताच मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता.

या उपक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पवार, खजिनदार प्रशांत खावडिया, सचिव सचिन जाधव, सुपरवायझर रघुनाथ हुंबरे, स्वयंसेवक दीपक क्षेत्रे व ग्रामपंचायत सदस्य अमोल खेडकर उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ साहित्यिक कवी बाळासाहेब नेटके, प्रा. गोरख अंबरीत, सामाजिक कार्यकर्त्या कविता नेटके आणि नवनाथ बोठे यांनी उपस्थित राहून संस्थेच्या या कौतुकास्पद कार्याचा गौरव केला. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष धामणे व शिक्षिका रुखिया तांबोळी यांनी आभार मानले.

पुण्याच्या संस्थेने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या पंखांना दिलेले हे बळ कौतुकास पात्र ठरत आहे.

# पोदार इंटरनॅशनल स्कूल, अहिल्यानगर शाळेत विविध योगासनाद्वारे योग दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पोदार इंटरनॅशल स्कूल मध्ये आज २१जून रोजी योगदिन व संगीत दिन साजरा करण्यात आला. योगाभ्यास हा भारताच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. याचेच महत्त्व लक्षात घेत शाळेतील विद्यार्थ्यांनी योग मार्गदर्शक श्री. नरेंद्र बोठे यांच्या मार्गदर्शनाखाली वज्रासन, गोमुखासन, बद्धकोनासन, सर्वांगासन असे विविध योगासने केली. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी नृत्यातूनही योगाचे प्रकार दाखवून दिले. योग दिनाबरोबर शाळेत संगीत दिन ही साजरा करण्यात आला.

शाळेतील संगीत शिक्षक श्री. मनोज बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध संगीत वाद्य वाजवून संगीतातील विविध कला सादर केल्या.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेचे प्राचार्य मा. श्री. मंगेश जगताप यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले, की योगाने मन शांत राहते. मन स्थिर राहते, ज्यामुळे सकारात्मक विचारांचा प्रवाह निर्माण होतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो तसेच अभ्यासात चित्त एकाग्र होते त्यासाठी फक्त एक दिवस योगासने न करता रोजच योगासने करायला हवी असे आवाहन या वेळी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना केले. तसेच विद्यार्थ्यांनी संगीतातील दाखवलेले कौशल्य विविध वाद्य वाजवून संगीत दिन साजरा केला त्याबद्दल विद्यार्थ्यांचा कौतुक केले. अगदी पहिली , दुसरीच्या विद्यार्थ्यांनी सुद्धा योगासने केल्याबद्दल याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना शाबासकी दिली, कौतुक केले.


## जाहीर नोटीस

**मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...**

**आरटीएस/अपील नं. २२७/२०२५**

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज. मु. सचिन रामदास कासार विरूध्द
रेस्पॉडंट भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर
प्रति, १) प्रमोद उद्धव रासने, २) हेमा अनिल रासने, ३) ऐश्वर्या अनिल रासने, ४) श्रावणी अनिल रासने, नं. १ ते ४ रा. श्रीराम कॉलनी, आरती हॉटेल मागे, नगर-पुणे रोड, केडगाव, अहिल्यानगर. ५) प्रविण मोतीलाल डोरले, रा. बोरीवली, मुंबई, ६) सुरेखा सुहास रामचंद्रे, रा. सराफ कट्टा, मु. पो. सांगली, जि. सांगली, ७) चंद्रकला मनोहर कुंभषर्ण, ८) निर्मला रमेश पानपट, ९) रंजना प्रकाश रासने, नं. ७ ते ९ रा. दगडे गल्ली, मु. पो. शिरूर कासार, ता. शिरूर कासार, जि.बीड १०) भारती रमेश थिटे, रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे. ११) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे, रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर. १२) सिंधूबाई भोपाळराव बागवडे, रा. फ्लॅट नं. ९, फेज नं. ३, वर्धमान कॉलनी, कोल्हापूर रोड, सांगली, जि. सांगली.
ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. ११०/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरूध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उतरार्थी पक्षकार म्हणून सामील असून तुम्हास तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवून देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दि. २९/०६/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असून सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वत: अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

**मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...**

**आरटीएस/अपील नं. २२८/२०२५**

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज. मु. सचिन रामदास कासार विरूध्द
रेस्पॉडंट भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर
प्रति, १) अनिता राजेंद्र माहुरकर, रा. घ. नं. २५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर, २) सुरेखा सुहास रामचंद्रे, ३) सतिष वसंत रामचंद्रे, अ. नं. २ व ३ रा. सराफ कट्टा, मु.पो. सांगली, जि. सांगली, ४) निर्मला रमेश पानपट, ५) रंजना प्रकाश रासने, नं. ३ व ४ रा. दगडे गल्ली, मु. पो. शिरूर कासार, ता. शिरूर कासार, जि. बीड, ६) भारती रमेश थिटे, रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे. ७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे, रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर.
ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. १०९/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरूध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उतरार्थी पक्षकार म्हणून सामील असून तुम्हास तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवून देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दि. २९/०६/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असून सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वत: अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

**मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...**

**आरटीएस/अपील नं. २२९/२०२५**

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज. मु. सचिन रामदास कासार विरूध्द
रेस्पॉडंट भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर
प्रति, १) अनिता राजेंद्र माहुरकर, रा. घ. नं. २५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर, २) सुरेखा सुहास रामचंद्रे, रा. सराफ कट्टा, मु. पो. सांगली, जि. सांगली, ३) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण, ४) निर्मला रमेश पानपट, ५) रंजना प्रकाश रासने, नं. ४ ते ६ रा. दगडे गल्ली, मु. पो. शिरूर कासार, ता. शिरूर कासार, जि. बीड, ६) भारती रमेश थिटे, रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे. ७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे, रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर. ८) सिंधूबाई भोपाळराव बागवडे, रा. फ्लॅट नं. ९, फेज नं. ३, वर्धमान कॉलनी, कोल्हापूर रोड, सांगली, जि. सांगली.
ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. १०८/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरूध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उतरार्थी पक्षकार म्हणून सामील असून तुम्हास तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवून देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दि. २९/०६/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असून सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वत: अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

**मा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे कोर्टात...**

**आरटीएस/अपील नं. २३०/२०२५**

ॲपेलंट
मोहन विश्वनाथ उंडे यांचे ज. मु. सचिन रामदास कासार विरूध्द
रेस्पॉडंट भाऊसाहेब एकनाथ निमसे व इतर
प्रति, १) अनिता राजेंद्र माहुरकर, रा. घ. नं. २५५३, जुनी घासगल्ली, शहाजी रोड, अहिल्यानगर, २) सुरेखा सुहास रामचंद्रे, रा. सराफ कट्टा, मु. पो. सांगली, जि. सांगली, ३) चंद्रकला मनोहर कुंभकर्ण, ४) निर्मला रमेश पानपट, ५) रंजना प्रकाश रासने, नं. ४ ते ६ रा. दगडे गल्ली, मु. पो. शिरूर कासार, ता. शिरूर कासार, जि. बीड, ६) भारती रमेश थिटे, रा. थिटे अपार्टमेंट, तुकाराम नगर, खराडी रोड, चंदन नगर, पुणे. ७) बाळकृष्ण विश्वनाथ उंडे, रा. अशोकनगर फाटा, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर. ८) सिंधूबाई भोपाळराव बागवडे, रा. फ्लॅट नं. ९, फेज नं. ३, वर्धमान कॉलनी, कोल्हापूर रोड, सांगली, जि. सांगली.
ज्याअर्थी अपेलंट यांनी उपविभागीय अधिकारी अहिल्यानगर येथील भाग अहिल्यानगर यांच्याकडील आरटीएस/विलंब माफी अर्ज नं. १११/२०२४ दि. ११/०४/२०२५ रोजीच्या आदेशा विरूध्द या न्यायालयात अपील दाखल केलेले आहे. सदरच्या अपीलामध्ये तुम्हा उतरार्थी पक्षकार म्हणून सामील असून तुम्हास तलाठी तसेच नोंदणीकृत डाकेने नोटीसा पाठवून देखील नोटीसची बजावणी होऊ शकलेली नाही. त्याअर्थी तुम्हास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदरच्या अपीलामध्ये दि. २९/०६/२०२६ रोजी दु. ३.०० वा. अपर जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे दालनात सुनावणी नेमलेली असून सदर दिनांकास, वेळेस व ठिकाणी आपण स्वत: अथवा विधिज्ञामार्फत हजर रहावे. आपण सदर सुनावणीस हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या गैरहजेरीत अपिलाची सुनावणी होऊन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
सदरची जाहीर नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
अपर जिल्हाधिकारी,
अहिल्यानगर

# शिर्डीतील साई तीर्थला नक्की भेट द्यावे असे ५ अनुभव - श्रेया मालपानी, संचालक, मालपानी ग्रुप







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आता शिर्डीची सहल केवळ मंदिराच्या दर्शनापुरती मर्यादित राहिलेली नाही. साईबाबा मंदिरापासून अवघ्या ५ मिनिटांच्या अंतरावर असलेले इमॅजिकाचे 'साई तीर्थ भक्ती थीम पार्क' हे शिर्डीच्या प्रमुख पर्यटन आकर्षणांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. यात पर्यटकांना एकाच छताखाली अध्यात्म, मनोरंजन, तंत्रज्ञान, कथाकथन आणि संस्कृती यांचा मिलाफ मिळतो. साई तीर्थ हे भारतातील पहिले इनडोअर, पूर्णपणे वातानुकूलित भक्ती थीम पार्क आहे, ही गोष्ट त्याचे ठळक वेगळेपण आहे. सर्व वयोगटातील अभ्यागतांसाठी तो एक आरामदायक आणि कौटुंबिक अनुभव ठरतो, विशेषत: दर्शनानंतर. आणखी एक भक्तीचे स्थान म्हणून नव्हे तर संपूर्ण अनुभवाचे डेस्टिनेशन म्हणून याची रचना करण्यात आली असून, साई तीर्थ या माध्यमातून कुटुंबे, मुले, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण प्रवाशांना समरस होण्याजोगी आकर्षणे, सिनेमॅटिक कथाकथन, परस्परसंवादी अनुभव आणि नेत्रदीपक थेट मनोरंजनाद्वारे एकत्र दर्जेदार वेळ घालवता येतो. साई तीर्थ शिर्डीमधील नक्की भेट देण्याजोगे ठिकाण बनविणारे ५ अनुभव आहेत :

१. तीर्थ यात्रा संपूर्ण भारताचा आध्यात्मिक प्रवास तीर्थ यात्रा अभ्यागतांना भारताच्या विविध भागांतील १० प्रतिष्ठित मंदिरांचा जादुई प्रवास घडवून आणते. यात इमर्सिव्ह व्हिज्युअल्स, मोशन इफेक्ट्स आणि कथाकथनांसह अध्यात्माची सांगड घालून, या आकर्षणाद्वारे एकाच अविस्मरणीय प्रवासातून देशभराची मिनी तीर्थयात्रा पूर्ण करण्याची भावना पुन्हा निर्माण होते. कुटुंबे आणि प्रथमच येणारे अशा दोघांसाठीही हे साई तीर्थमधील सर्वांत आवडते आकर्षण आहे.

२. कथा, ज्योत आणि विश्वास : काळाचा फेरफटका – द्वारकामाई साई तीर्थपासून जवळच असलेली द्वारकामाई हे शिर्डीच्या आध्यात्मिकदृष्ट्या सर्वांत महत्त्वपूर्ण ठिकाणांपैकी एक आहे. साईबाबांनी आपल्या आयुष्याचा बराचसा काळ जिथे घालवला, अशा या पवित्र ठिकाणी अजूनही सतत जळणारी अखंड धुनी (पवित्र अग्नी) आहे. येथील शांत आणि चिंतनशील वातावरणामुळे शिर्डीच्या सखोल आध्यात्मिक सारतत्त्वाशी जोडले जाण्याची इच्छा असणाऱ्या अभ्यागतांसाठी हा एक सार्थक थांबा ठरतो.

३. साईबाबा मोझॅक – एक विक्रमी कलाकृती इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळालेले साईबाबा मोझॅक हे साई तीर्थमधील सर्वांत अनोख्या वैशिष्ट्यांपैकी एक आहे. चिन्मय प्रभू या युवा कलाकाराने शेकडो रुबिक्स क्यूब्स वापरून तयार केलेली, ही लार्जर दॅन लाइफ कलाकृती सर्जनशीलता आणि भक्ती यांचे सुंदर मिश्रण आहे. चमकदार, डोळ्यांत भरण्याजोगी आणि अत्यंत तपशीलवार अशी ही कलाकृती उद्यानातील सर्वाधिक छायाचित्र घेण्यात आलेल्या आकर्षणांपैकी एक बनली आहे.

४. लेझर शो जिथे साईबाबांची कहाणी जिवंत होते संध्याकाळ होताच साई तीर्थचे रूपांतर प्रकाश, ध्वनी आणि कथाकथनाच्या नेत्रदीपक जगात होते. हा इमर्सिव्ह लेझर शो स्तंभित करणारे व्हिज्युअल इफेक्ट्स, संगीत, कथन आणि लार्जर-दॅन-लाइफ प्रोजेक्शनद्वारे साईबाबांचे जीवन आणि शिकवण जिवंत करतो. त्यामुळे अभ्यागतांच्या दृष्टीने भावनिक आणि सिनेमॅटिक अनुभवाची निर्मिती होते. या अनुभवातून कुटुंबे आणि प्रवाशांना संस्मरणीय पद्धतीने शिर्डी भेटीचा समारोप करण्याचा मार्ग सापडतो.

५. सबका मलिक एक – जिथे साईबाबांचा संदेश जिवंत होतो सबका मलिक एक हे साईबाबांचे जीवन, शिकवण आणि तत्त्वज्ञान पडद्यावर साकारणारा एक चित्ताकर्षक सिनेमॅटिक सादरीकरण आहे. पिढ्यान् पिढ्या लाखो लोकांना प्रेरणा देणाऱ्या विश्वास, करुणा, मानवता आणि एकता या कालातीत मूल्यांवर इमर्सिव्ह कथाकथन, प्रभावी व्हिज्युअल आणि भावनिकदृष्ट्या गुंतविणारे प्रसंग यांद्वारे प्रकाश टाकणारा हा अनुभव आहे. आज साई तीर्थ हे शिर्डीमधील आणखी एका आकर्षणापेक्षा बरेच काही आहे- ते आधुनिक शिर्डीच्या अनुभवाचा एक अत्यावश्यक भाग बनले आहे. साईबाबा मंदिरापासून सोयीस्कर ठिकाणी असलेले आणि सर्व वयोगटातील अभ्यागतांसाठी विचारपूर्वक डिझाइन केलेल्या या ठिकाणी भक्ती, आराम, मनोरंजन आणि संस्कृतीचा परिपूर्ण संगम मिळतो. आज अनेक कुटुंबांना आणि प्रवाशांना, शहरातील सर्वात अनोख्या आणि संस्मरणीय आकर्षणांपैकी एक असलेल्या साई तीर्थ चा अनुभव घेतल्याशिवाय शिर्डीचा प्रवास अपूर्ण वाटतो.

# समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग डिप्लोमा कॉलेजचा उत्कृष्ट निकाल

## ९३.३४ टक्के एकूण यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शेवगाव–** केदारेश्वर ग्रामीण विकास प्रतिष्ठान, संगमनेर संचलित समाजभूषण एकनाथराव ढाकणे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेवगाव यांनी एमएसबीटीई उन्हाळी परीक्षेमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९३.३४ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी विविध शाखांमध्ये उज्ज्वल यश मिळवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

निकालानुसार प्रथम वर्षाचा निकाल ९०.५५ टक्के, द्वितीय वर्षाचा निकाल ९४.८२ टक्के तर तृतीय वर्षाचा निकाल ९४.६६ टक्के लागला आहे. सर्व विभागांतील विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश संपादन केले.

सिव्हिल इंजिनिअरिंग विभागात प्रथम वर्षातून प्रशांत फुंदे (७५.८९%), द्वितीय वर्षातून निखिल बोरुडे (७१.३१%) तर तृतीय वर्षातून प्राजक्ता गरजे (७९.८३%) यांनी अव्वल स्थान पटकावले. कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागात अदिती खाडके (८०.४७%), अंजली येवले (७७.१८%) आणि प्रियंका काकडे (८२.५९%) यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षात उत्कृष्ट यश मिळविले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात ओंकार पायघाण (७२.४०%), अयान पठाण (७४.५०%) आणि सुजीत पाटोळे (७५.००%) यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागात कृष्णा शिंदे (७७.४१%), ऋतुजा मोरे (७३.४१%) आणि रोहन काटके (७३.५०%) यांनी विभागात अव्वल स्थान प्राप्त केले.

यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे म्हणाले, ''ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संस्था सातत्याने कार्यरत आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या कठोर परिश्रमाचे, पालकांच्या सहकार्याचे आणि प्राध्यापकांच्या समर्पित मार्गदर्शनाचे फलित आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांनी ज्ञान, कौशल्य आणि संस्कारांच्या बळावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करावे, हीच अपेक्षा आहे. संस्थेच्या सर्व विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि प्राध्यापकांचे मनः पूर्वक अभिनंदन.''

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत ढाकणे, सचिव जया रहाणे, कोषाध्यक्ष हृषीकेश ढाकणे, प्राचार्य डॉ. अंबादास डोंगरे,प्रा. रियाझखान अत्तार, प्रा.महेश मरकड प्रा. सुनील औताडे, प्रा. प्रवीण नागरगोजे तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालामुळे विद्यार्थी, पालक आणि परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळातही गुणवत्तापूर्ण शिक्षण व उत्कृष्ट निकालांची परंपरा कायम ठेवण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होणारी देशाची प्रगती अभिमानास्पद : अनिल मोहिते

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ऐतिहासिक १२ वर्षांच्या कार्यकाळाबद्दल आनंदोत्सव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांनी केंद्र सरकारच्या सत्तेत १२ वर्षे पूर्ण केली आहेत. तब्बल एक तपाच्या वाटचालीत भारताचा चेहरामोहरा बदलला असून देश जागतिक महासत्ता बनत आहे. सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडविण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. या काळात देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सुरक्षेच्या क्षेत्रात अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले गेले आहेत. प्रत्येक भारतीयासाठी देशाची प्रगती अभिमानास्पद आहे, असे प्रतिपादन भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रातील सत्तेत सलग १२ वर्षे पूर्ण केल्याबद्दल नगरमध्ये भाजपचं शहर जिल्हा उपाध्यक्ष महावीर कांकरिया, श्री विश्वकर्मा सुतार समाजाचे शहराध्यक्ष देवेंद्र दुधाले व व्यापारी आघाडीचा वतीने गांधी मैदान येथील पक्ष कार्यालयासमोर आनंदोत्सव साजरा करण्यात आला. याठिकाणी मोदी सरकारच्या ऐतिहासिक निर्णयांची माहिती देणारा फ्लेक्स लावण्यात आला होता. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सरचिटणीस अशोक गायकवाड, महेश नामदे, उदय अनभुले, उपाध्यक्ष महावीर कांकरिया, देवेंद्र दुधाले, दीपक देहरेकर, संजय गायकवाड, कालिंदी केसकर, पूजा आहेर, प्रिया जानवे, संध्या पावसे, सुरेखा जंगम, सचिन पळशीकर, ॲड. ऋद्रेश अंबाडे आदी उपस्थित होते.

महावीर कांकरिया म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बारा वर्षांच्या कार्यकाळात जगभरात देशाची मान उंचावली आहे. जम्मू आणि काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० हटवून, राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अयोध्येत भव्य राम मंदिराच्या निर्मितीचा मार्ग मोकळा झाला आणि मंदिर उभारणी पूर्ण झाली. एक देश, एक कर या संकल्पनेवर आधारित जीएसटी प्रणाली लागू करून संपूर्ण देशात कर एकसमान करण्यात आले.

मुस्लिम महिलांना जाचक असलेल्या तिहेरी तलाक प्रथेला कायदेशीररित्या गुन्हा ठरवून बंदी घालण्यात आली. दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला धडा शिकवला. पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधून आलेल्या अल्पसंख्याक निर्वासितांना भारताचे नागरिकत्व देणारा कायदा लागू करण्यात आला. देशात डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी युपीआयचा विस्तार करण्यात आला, ज्याचा जागतिक स्तरावरही मोठा गौरव झाला.

देशातील अस्वच्छतेच्या समस्येवर मात करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय रुजवण्यासाठी मोठे राष्ट्रीय अभियान राबवले. प्रधानमंत्री आवास योजना, आयुष्मान भारत योजना, आणि जन धन योजना यांसारख्या योजनांद्वारे तळागाळातील लोकांपर्यंत थेट आर्थिक आणि आरोग्यविषयक लाभ पोहोचवले. गतिशक्ती योजनेअंतर्गत रेल्वेचे आधुनिकीकरण, रस्ते जाळ्याचा विस्तार आणि नवीन विमानतळांची निर्मिती करून विकासाला गती देण्यात आली. देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी आणि परकीय आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी मेक इन इंडिया व आत्मनिर्भर भारत हे महत्त्वाचे आर्थिक धोरण अंमलात आणले. सर्वच घटकांना न्याय देत विकासाच्या मार्गावर नेण्याचं काय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाले आहे.

# ऐतिहासिक अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिर जीर्णोद्धारासाठी रु. ५१ हजारांची देणगी

## शतकपूर्ती वर्षानिमित्त सुरू असलेल्या भव्य जीर्णोद्धार कार्यास समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या अहिल्यानगर नगरीतील पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत व कुलदैवत असलेल्या श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिराला यावर्षी गौरवशाली १०२ वर्षे पूर्ण होत आहेत. समाजाच्या श्रद्धेचे, संस्कृतीचे आणि एकतेचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंदिराच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त भव्य जीर्णोद्धार व विस्तार प्रकल्प हाती घेण्यात आला असून त्याचे काम सध्या वेगाने प्रगतीपथावर आहे.

महर्षी मार्कंडेय महामुनी हे पद्मशाली समाजाचे कुलदैवत मानले जातात. समाजाच्या आध्यात्मिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे ते प्रेरणास्थान असून त्यांच्या आशीर्वादाने समाजाने अनेक पिढ्यांपासून आपली संस्कृती आणि परंपरा जपली आहे. त्यामुळे या ऐतिहासिक मंदिराचे संवर्धन व जतन करण्यासाठी समाजबांधवांनी एकत्र येत जीर्णोद्धाराच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धार प्रकल्पांतर्गत दोन महिन्यांपूर्वी पहिल्या स्लॅबचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. स्लॅब पूजन सोहळ्याच्या वेळी मंदिराचे अध्यक्ष पैलवान श्रीकांत छिंदम यांनी मंदिराच्या पुढील बांधकामासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक व भाविकांनी उदार हस्ते आर्थिक सहकार्य करावे, असे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला समाजातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक दात्यांनी मंदिर विकासासाठी मदतीचा हात पुढे केला आहे.

याच भावनेतून कमलाक्षी शंकर येमुल यांनी श्री महर्षी मार्कंडेय महामुनी मंदिराच्या जीर्णोद्धार निधीसाठी रु. ५१,०००/- इतकी देणगी देऊन समाजाप्रती असलेली आपली श्रद्धा आणि बांधिलकी व्यक्त केली. त्यांनी ही देणगी मंदिराचे अध्यक्ष पैलवान श्रीकांत छिंदम यांच्याकडे सुपूर्त केली. त्यांच्या या उदार योगदानाबद्दल मंदिर समितीच्या वतीने विशेष सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी शकुंतला गुंडू, अंबिका सामलेटी, रेणुका बत्तीन, सुनंदा कुरापाटी, लक्ष्मी नक्का, पोलिस अधिकारी राहुल गुंडू, विनायक गुडेवार, महेश सब्बन, पद्मशाली ज्ञाती समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी, माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम, दत्तात्रय कुरापट्टी, पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे संचालक राजू म्याना, पद्मशाली युवा शक्ती ट्रस्टचे खजिनदार दीपक गुंडू यांच्यासह समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या धार्मिक आणि सामाजिक इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या या मंदिराच्या शतकपूर्ती वर्षानिमित्त सुरू असलेला जीर्णोद्धार प्रकल्प हा केवळ बांधकामाचा उपक्रम नसून समाजाच्या एकतेचा, श्रद्धेचा आणि सांस्कृतिक वारशाच्या जतनाचा संकल्प आहे. मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण झाल्यानंतर भाविकांसाठी अधिक सुविधा उपलब्ध होणार असून भावी पिढ्यांसाठी हा आध्यात्मिक वारसा अधिक भव्य आणि आकर्षक स्वरूपात जतन केला जाणार आहे.

मंदिराच्या उर्वरित बांधकाम साठी समाजातील सर्व दानशूर व्यक्तींनी सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

श्री महर्षी मार्कंडेय महामुनींच्या कृपेने समाज एकवटला, आणि शतकपूर्ती वर्षात भव्य मंदिर उभारणीचा संकल्प साकार होत आहे.

# देहरे येथे कृषी कन्यांकडून ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देहरे येथे विळदघाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण मुल्यमापन सर्वे क्षणाचे उत्कृष्ट आयोजन केले.या उपक्रमात ढेरे गायत्री, गांगर्डे श्रेया, गोंडाळ श्रेया, कर्डिले स्नेहल, खटाने समीक्षा, नेहुल वैष्णवी, निकम स्नेहल या विद्यार्थीनीने गावक-यांच्या सहभागातून विविध मूल्याकनांत आराखडे तयार केले, शेतकर्यांच्या सक्रिय सहभागातून सामाजिक नकाशा, दळणवळण नकाशा, प्रमुख पिकांच्या आराखडा तयार करण्यात आले.

या माध्यमातून विद्यार्थीनीने गावातील विविध समस्या, शेतीविषयक अडचणी जाणून घेतल्या, तसेच गावक-यांशी चर्चा करून त्यांच्या सूचना व अभिप्राय संकलित करण्यात आले. विद्यार्थीनींनी गावाची शेताची परिस्थिती, तसेस शेतक-याना भेडसावरण्या अडचणींचा अभ्यास केला. सामाजिक संस्थांचे दर्शन घडवण्यासाठी रंगीत रांगोळीच्या माध्यामातून संशोधन नकाशा तयार करण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश्वर राऊत, कार्यक्रम समन्वयक प्रा.किरण दांगडे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ.दिपीका मावळे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषिकन्यांकडून देहरे गावचे ग्रामीण मूल्यमापन सर्वेक्षण करून रांगोळीच्या माध्यमातून साकारल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले कृषी महाविद्यालयाकडून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल सरपंच ग्रामसेवक आदींनी त्यांचे आभार मानले.

(पान १ वरून)

## काकासाहेब म्हस्के होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या स्थलांतराचा घाट!

स्टाफकडे जाऊन माहिती घेतली असता, त्यांनी यासंदर्भात आम्हाला अधिक काही माहिती नाही, असे सांगितले. तसेच यासंदर्भात उद्या (दि. २५) रोजी व्यवस्थापनाने विद्यार्थी व पालकांची दुपारी दोन वाजता बैठक बोलावली असल्याचा मेसेज कॉलेजच्या ग्रूपवर टाकण्यात आला. कॉलेजचे अचानक स्थलांतर करण्याचा घाट घातला गेल्याने विद्यार्थी व पालकवर्ग हतबल झाला आहे. तसेच येथे काम करणा-या कर्मचा-यांच्या भवितव्याचाही प्रश्न यामुळे निर्माण होणार आहे. त्यामुळे या स्थलांतरास विद्यार्थी व पालक वर्गाचा तीव्र विरोध आहे. उद्याच्या बैठकीत पालक आपला विरोध व्यक्त करणार असून, व्यवस्थापन याबाबत काय निर्णय घेते याकडे विद्यार्थी व पालकांचे लक्ष लागले आहे.

## दिल्लीगेट येथील रस्ता दुभाजक असून अडचण

दिल्ली गेट वेस ते घोरपडे हॉस्पिटल दरम्यान काही महिन्यांपूर्वी रस्ता दुभाजक उभारण्यात आले होते. मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम असलेल्या या रस्ता दुभाजकावर रात्रीच्या वेळी चमकणारे किंवा दिशादर्शक रेडियम अथवा रिफ्लेक्टर बांधकाम ठेकेदाराच्या माध्यमातून लावण्यात आलेले नाही. यामुळे रात्रीच्या वेळी वाहन चालकांना हे दुभाजक दिसून येत नसल्याने वारंवार या ठिकाणी अपघात होतच असतात. महिनाभरापूर्वी या दुभाजकांमधील अर्धा हिस्सा महानगरपालिकेच्या वतीने काढून टाकण्यात आलेला आहे. मात्र उर्वरित रस्ता दुभाजकामुळे रात्रीचा सुमारास आज पर्यंत अपघात झाले आहेत.

## पारनेरचा चेहरामोहरा बदलणार – आ. काशिनाथ दाते

या मार्गावर पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर हा रस्ता दर्जेदार पद्धतीने विकसित करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. बुगेवाडी परिसरातील नागरिकांनी उपस्थित केलेल्या विविध रस्त्यांच्या मागण्यांबाबत बोलताना आमदार दाते म्हणाले की, या सर्व कामांना यापूर्वीच प्रशासकीय मंजुरी मिळालेली असून केवळ निविदा प्रक्रिया शिल्लक आहे. ती पूर्ण होताच प्रत्यक्ष कामांना सुरुवात होईल. विधानसभा निवडणुकीत पारनेरकरांनी मोठ्या मताधिक्याने आपल्यावर दाखविलेला विश्वास आपण विकासकामांच्या माध्यमातून सार्थ ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र गेल्या दीड वर्षांत नगरपंचायतीत आपल्या विचारांचे पदाधिकारी सत्तेत नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली. यापुढील काळात राजकीय मतभेद आणि वैयक्तिक वाद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे सांगताना आमदार दाते म्हणाले की, पारनेर शहराचा सर्वांगीण विकास हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा पक्षाचा विषय नसून तो सर्वांचा सामूहिक संकल्प आहे. सर्वांनी हातात हात घालून काम केल्यास पारनेरला आधुनिक, सुशोभित आणि सर्व सुविधांनी युक्त शहर बनविणे अशक्य नाही. विकासाच्या या प्रवासात सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जिल्हा परिषदचे माजी सदस्य वसंतराव चेडे, माजी पंचायत समिती सदस्य शंकर नगरे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता शेठ कुलट, नगरसेवक अशोक चेडे, माऊली औटी, राजू शेठ औटी, सुनील गाडगे, युवराज पठारे, भाऊ ठुबे, कांतीलाल ठाणगे, शिवाजी जाधव, बाळासाहेब औटी, विठ्ठल कावरे, शामा औटी सर, कैलास गुंजाळ, सिद्धांत देशमाने, अभिजीत नाईक, शेषमल बोरा, अनिल भंडारी, संतोष गांधी, मच्छिंद्र गायकवाड साहेब, शेटे महाराज, सुनील चौगुले, रामदास दाते, प्रदीप नगरे, शांताराम तराळ, देवा ठाणगे, भास्कर डोंगरे, बबन शिंदे, अर्जुन शिंदे, गोरख शिंदे, दुर्गाजी शिंदे, मच्छिंद्र शिंदे, करण शिंदे, अविनाश शिंदे, तुषार शिंदे, सुभाष घोडके, स्वप्निल औटी, सचिन औटी, परेश औटी, विठ्ठल औटी, अनुराधा पवळे, सुनिता सोबले, जयश्री शेरकर, रंजना शेरकर, उज्वला इधाटे, नीलम गोसावी, स्वप्नाली शेळके, सारिका सोनवणे, गायत्री सोनवणे, कमल इधाटे आदी मान्यवर ग्रामस्थांसह स्थानिक नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.